# बृहन्मुंबई महानगरपालिका

(घन कचरा व्यवस्थापन खाते एफ/उत्तर)

क्र. सअ/घकव्य/6354/एफ/उ दि. 04.08.2022

## स्वारस्य अभिव्यक्ती

सहाय्यक आयुक्त एफ/उत्तर विभाग, गणेश उत्सव–2022 करिता सायन तलाव येथे दि. 31.08.2022 ते 10.09.2022 पर्यंत साफ सफाईच्या कामाकरिता इच्छुक संस्थाकडून त्यांची पात्रता यादी तयार करून काम करण्यासाठी अर्ज मागवित आहे.

इच्छुक संस्थांनी आपले अर्ज एन.जी.ओ. उपनिबंधक सहकारी संस्था (मल्होत्रा हाऊस) अथवा धर्मादाय आयुक्त येथील नोंदणीकृत असणे आवश्यक आहे. संस्थेने अर्जात संस्थेचा वेंडर कोड, ई-मेल आय.डी. व बँक खाते क्रं. नोंद करणे अनिवार्य आहे. सदर अर्ज संस्थेच्या लेटर हेडवर दि. 04.08.2022 ते दि. 10.08.2022 रोजी सकाळी 10.00 ते दुपारी 05.00 या वेळेत (घकव्य) एफ/उत्तर कार्यालयात जमा करावेत.

तसेच अर्ज सादर करण्याच्या अंतिम वेळेनंतर म्हणजेच दि. 10.08.2022 रोजी दुपारी 05.00 नंतर अर्ज स्विकारले जाणार नाहीत. पात्र / अपात्र संस्थेची यादी दि. 17.08.2022 रोजी 12.30 वाजता जाहीर करण्यात येईल. तसेच या यादीत कोणत्याही संस्थेला आपल्याला अपात्र केल्याबाबत आक्षेप असल्यास सदर आक्षेप लेखी स्वरुपात सादर करण्याची अंतिम वेळ दि. 17.08.2022 रोजी दुपारी 3.00 वाजता असेल त्या नंतर कोणताही आक्षेप स्विकारला जाणार नाही. अंतिम पात्र यादी ही दि. 18.08.2022 रोजी संध्याकाळी 5.00 वाजता जाहीर करण्यात येईल.

सोडती करिता सर्व पात्र संस्थेचे अध्यक्ष /उपाध्यक्ष/खजिनदार यौपकी एक पदाधिकारी उपस्थित राहणे अनिवार्य आहे. याची कृपया नोंद घ्यावी.

सही/-

**सहाय्यक अभियंता (घकव्य)**

**एफ/उत्तर विभाग**